वाचले:- १) महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृत्ती वेतन ) नियम-१९८२ मधील नियम १०(१)
२) मा. आयुक्त यांचेकडील अधिकार प्रदान आदेश क्र. प्रशा/२/कावि/४४७/१५, दि. २०/१०/२०१५.
३) सेवासातत्य आदेश क्र. माध्य. शिक्षण/४/कावि/३६९/०७, दि. २९/०६/२००७
४) मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय वाकड यांचे दि.१६/०३/२०१६ रोजीचे पत्र.
५) मा. लेखाधिकारी यांचेकडील दि. २४/२/२०१६ चे घरबांधणी अग्रीम नाहरकत प्रमाणपत्र.
६) मा. अतिरिक्त आयुक्त यांचेकडील दि. ५ /०४/२०१६ चा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८
माध्यमिक शिक्षण विभाग
क्र. माध्य/शि/१/कावि/४८९/१६
दि. ५ /०४/२०१६

विषय – <u>नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीबाबत.</u>
श्रीम. कदम सुधा बाळासाहेब, मुख्याध्यापक(संगणक क्रं.५७३३)

आदेश,

**श्रीम. कदम सुधा बाळासाहेब, मुख्याध्यापक** हया पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सहा. शिक्षक या पदावर माध्यमिक शिक्षण विभागात दि. १३/०१/१९८६ रोजी रूजू झालेले आहेत **श्रीम. कदम सुधा बाळासाहेब, मुख्याध्यापक**, यांची जन्मदिनांक ०१/०६/१९५८ अशी असून त्यांच्या वयास दिनांक ३१/०५/२०१६ रोजी ५८ वर्षे पूर्ण होत असल्याने **श्रीम. कदम सुधा बाळासाहेब, मुख्याध्यापक** यांना ३१/०५/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

शासकीय कर्मचारी तो ज्या महिन्यात ५८ वर्ष वयाचा होईल, त्या महिन्याच्या अखेरच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत्त होईल, तसेच ज्या शासकीय कर्मचा-याची जन्मतारीख ०१ असेल तो कर्मचारी यथास्थिती ५८ वर्ष वयाचा होताच मागील महिन्याच्या शेवटच्या दिवशी मध्यान्होत्तर सेवानिवृत्त होईल, अशी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम-१९८२ मधील नियम १०(१) मध्ये तरतूद आहे.या तरतूदीप्रमाणे **श्रीम. कदम सुधा बाळासाहेब, मुख्याध्यापक** हया दिनांक ३१/०५/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार मध्यान्होत्तर सेवानिवृत्त होतील.

**श्रीम. कदम सुधा बाळासाहेब, मुख्याध्यापक** यांचे विरूध्द कोणत्याही प्रकारची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावीत नाही. तसेच **श्रीम. कदम सुधा बाळासाहेब, मुख्याध्यापक** यांचे कडून महानगरपालिकेस भुखंड कर्ज, घरबांधणी कर्ज, वाहन कर्ज, संगणक कर्ज, घर दूरूस्ती कर्ज, वैद्यकीय अग्रीम तसेच माध्यमिक शिक्षक सहकारी पतपेढी मर्यादित यांचेकडील कर्ज येणे बाकी नाही व इतर कोणत्याही प्रकारचे येणे बाकी नसलेबाबतचे दाखले त्यांनी सादर केले आहेत. घरबांधणी अग्रीम थकबाकी नसलेबाबत वाचले क्र. ५ अन्वये मा. लेखाधिकारी यांनी अभिप्राय दिलेला आहे.

Scanned with CamScanner

श्रीम. कदम सुधा बाळासाहेब, मुख्याध्यापक यांना वाचले क्र. ३ चे आदेशान्वये सेवासातत्य देण्यात आलेले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेत रूजू होणेपूर्वी श्री. वाकेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाचे श्री. वाकेश्वर विदयालय,पेठ, ता. आंबेगाव, जि.पुणे येथे दि. १०/०६/१९८४ पासून ते १२/०१/१९८६ पर्यंत सहाय्यक शिक्षक म्हणुन कामकाज केलेले आहे. व दि. १३/०१/१९८६ पासुन मनपाच्या सेवेत सहाय्यक शिक्षक या पदावर कार्यरत आहेत.क्र.माध्य/शिक्षण/४/कावि/३६९/२००७,दि.२९/०६/२००७अन्वये दिनांक १०/६/१९८४ पासून सेवामुक्ती प्रमाणपत्राच्या प्रमाणे सेवासातत्य व वेतनाचा लाभ देण्यात आलेचे सेवानोंद पुस्तकातील नोंदीचे अवलोकन केले असता दिसुन आलेले आहे. ज्यांना सेवासातत्य दिलेले आहे त्यांचे संदर्भात भविष्यात लेखा परीक्षणाची वसुली निघाल्यास त्यांची संपुर्ण रक्कम पेन्शन मधून वसूल करणेस अधिन राहून रुजु दिनांक १०/०६/१९८४ याप्रमाणे नोंद घेणेत यावी.

सबब, मी शिक्षणाधिकारी, माध्यमिक शिक्षण विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी ४११ ०१८, उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये विभाग प्रमुख म्हणून मला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन महाराष्ट्र नागरी सेवा ( निवृती वेतन ) नियम-१९८२ मधील तरतूदी नुसार या आदेशान्वये **श्रीम. कदम सुधा बाळासाहेब, मुख्याध्यापक** यांना दिनांक ३१/०५/२०१६ रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस मान्यता देत आहे.

प्रस्तुत आदेशाची सविस्तर नोंद **श्रीम. कदम सुधा बाळासाहेब, मुख्याध्यापक** यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

सही/-
अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रती,

श्रीम. कदम सुधा बाळासाहेब, मुख्याध्यापक
माध्यमिक विद्यालय वाकड

प्रतः- १) लेखा शाखा
२) प्रशासन,कर्मचारी वैयक्तिक नोंदकक्ष,संगणक कक्ष,(प्रशासन) सेवाजेष्ठता कक्ष, मागासवर्गीय कक्ष, कामगार कल्याण विभाग
३) माध्यमिक विभाग टेबल क्रं. २ व ४
४) माध्यमिक विद्यालय वाकड

२/- पुढील कार्यवाहीसाठी

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

Scanned with CamScanner